## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

### (सकाळ)

जा.क्र. ७९७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/१२/२०१७

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या पीटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/१२/२०१७ चे ११.०० वाजता दरम्यान फिर्यादी हा त्याचे पाणठेल्यावर गिऱ्हाईकाला खर्रा विक्री करीत असता यातील आरोपी क्र. १ व २ यांनी कोणतेही प्रक्षोभक कारण नसतांना आरोपी क्र. १ नी दारू पिवुन फिर्यादीचे गालावर थापड मारून आमरोडवर येवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारपीट केले व पुन्हा मारपीट करण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३५२,२९४,५०६,३२३,३४ भादवी. सहकलम ८५(१) म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन शेतातील धानाचा पुंजना जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ३०/११/२०१७ चे ०.९.०० वाजता ते दिनांक १/१२/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती शोभा शत्रुघ्न बन्सोड वय ५१ वर्ष, रा. चांदोरी व संशयीत आरोपी यांचे शेतीचे जागेचा वाटाहिस्सा व त्या शेतीवरील सागवान जातीचे झाड विक्रीचे कारणावरुन झालेल्या वादामुळे फिर्यादीचे चांदोरी गावाचे शेतशिवारातील गट क्र. २७० हेंक्टर आर १.०१ शेतजमिनीतील रचुन ठेवलेला धानाचा पुंजना यातील संशयीत आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे धानाचा पुंजना अंदाजे ९०,००० ते ९५,०००/–रु. चे जाळुन नुकसान केले असल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४३५,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) ट्रक निष्काळजीपणे चालवुन मारुती सियाज गाडीला मागेहुन धडक दिल्याने गाडीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०१/१२/२०१७ चे १५.४७ वाजता दरम्यान यातील फिर्यादी अविनाश प्रल्हाद शाहु वय ५५ वर्ष, रा. २०३ रिशभ रेसिडेन्सी न्यु राजन नगर जि. रायपुर याचे ताब्यातील मारुती सियाज क्र. सि.जी ०४ एल के. ६२७२ ने एनएच ६ रोडने नागपुर कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक ओव्हरटेक करुन अतिवेगाने चालवुन फिर्यादीचे मारुती सियाज गाडीला मागेहुन धडक दिल्याने गाडीचे अंदाजे ५०,०००/–रु. चे नुकसान झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादवी. सहकलम १३४/१७७ मो. वा. का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) भांडण करुन काठीने हातावर डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/१२/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी विमल राजकुमार रामटेके वय ४८ वर्ष, रा. समाज मंदिर जवळ आंबेडकर वार्ड भंडारा याने आपले सासुला घरात दुध कोणी सांडविले? असे विचारले असता आरोपीने माझे नाव का घेता म्हणुन फिर्यादी सोबत भांडण केले व काठीने फिर्यादीचे उजव्या हातावर, डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) बेकादेशिर जमाव करुन रस्ता अडविल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/११/२०१७ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुमित नामदेव माकडे वय २० वर्ष, रा. सिल्ली हा महाराष्ट्र मेटल पावडर लिमीटेड कंपनी मारेगाव येथे लेबर म्हणुन कामाला आहे. फिर्यादी हा नेहमी प्रमाणे कामावर गेला असता यातील अज्ञात १० ते १२ लोकांनी बेकायदेशिर जमाव करुन फिर्यादीचा रस्ता अडवुन कामावर जावु दिले नाही अशा फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४३,३४१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) मोटार सायकल चालकांच्या धडकेत एक जखमी :-**

दिनांक ३०/११/२०१७ चे २१.३० ते २२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रितम चंद्रशेखर बागडे वय २३ वर्ष, रा. श्रीराम नगर तुळजाभवानी मंदीर चे बाजुला खात रोड भंडारा याचे वडील चंद्रशेखर डोमाजी बागडे रा. श्रीराम नगर खात रोड भंडारा हे एनएच ६ रोडने भंडारा येथे सायकलने जात असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगईने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे वडीलाचे सायकलला एन एच ६ रोडवर धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) मोटार सायकल चालकाने बॅरिकेट्सला धडक दिल्याने दोन जखमी . :-**

दिनांक ०१/१२/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील मोटार वर फिर्यादी यास बसवुन आरोपी स्वत: मोटर सायकल चालवत खैरलांजी येथुन नागपुर येथे एनएच ०६ रोडनी जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकल ही लोखंडी बॅरिकेट्स वर धडक मारुन आरोपी स्वत: व मागे बसलेला फिर्यादी यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी प्रशांत प्रदीप बोरकर वय २९ रा. खैरलांजी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**८) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :-**

दिनांक ०१/१२/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे घरी एकटीच असतांना ातील आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर रोडवर येवुन तिला सकाळी बैल नेतांनी मला शिवा का दिल्या? या संशयावरुन आरापीने फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**९) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक ०१/१२/२०१७ चे ११.५० वाजता दरम्यान यातील मृतक अनोळखी इसम वय अंदाजे ५५ वर्ष, वयोगटातील याने अतीजास्त प्रमाणात मद्य प्राशन केल्याने त्याची प्रकृती बिघडल्याने त्याला औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे आयसीयु वार्डात दिनांक ३०/११/२०१७ चे ११.३० वाजता दरम्यान भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सैनीक गोंदुरकुरवार यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**१०) अचानक प्रकृती खराब झाल्याने चिमुरडयांचा मृत्यु . :—**

दिनांक ३०/११/२०१७ चे ११.३० वाजता दरम्यान यातील मृतक अर्णव हरीदास शरणागत वय ५ वर्ष, रा. उर्सरा याला दोन दिवसापुर्वी ताप आल्याने त्याच्या आईने तापाची औषधी गोळी दिली असता, मृतकची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास सु. बो. दवाखाना येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन पाहीले असता मरण पावल्याचे सांगीतल्याने फिर्यादी संदीप सुखराम पारधी वय ३० वर्ष, रा. उर्सरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जा.फौ. चे दाखल करुन मर्ग डायरी पोस्टे आंधळगाव येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सैनीक बारई यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेती पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**११) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :—**

दिनांक २९/११/२०१७ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. ललीता बालीकराम भड वय २२ वर्ष, रा. नवेगाव जि. नागपुर ही उपचारा करीता माहेरी देवनारा येथे तिचे वडीलाचे घरी एका महिण्यापासुन आली होती. तिची अचानक प्रकृती बिघडल्याने तिला उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता अज्ञात आजाराने उपचारा दरम्यान ती मरण पावल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे डॉक्टरी मेमो वरुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. बिसने यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे गोबरवाही येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**१२) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०१/१२/२०१७ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**१३) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक ०१/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, करडी व वरठी येथील अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५०+ १० किलो सडवामोहा + साहित्य किंमती ६,०००/—रु. व जुगारातुन किंमती ३९५/—रु. असा एकुण किंमती ६,३९५/रु चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०१/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १११ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०४ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व ईतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आलेले आहे.

02.12.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.